नियमित दिवाणी दावा क्र.५९९/२०२२

निशाणी ४२ वरील आदेश

सदरचा अर्ज हा महत्वाचे कागदपत्रे दाखल करुन घेण्याच्या विनंतीने केलेला आहे.

२. प्रतिवादी याने अर्जास हरकत घेवुन कथन केले की, अर्ज खरा नाही, वादी हेच मयत झाले असुन सदरचे कागदपत्रे वादीच्यावतीने दाखल करता येणार नाही. तसेच त्यांच्या आक्षेपानुसार सदरचे कागदपत्रे झेरॉक्स असल्याने मान्य नाहीत व अर्ज रद्द करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे. त्यांच्या युक्तिवादानुसार दावा यापुर्वीच वादी मयत झाल्याने अबेट झालेला आहे.

३. सदर प्रकरणाचे अवलोकन केले असता नि.३६ नुसार सुनिल उदयसिंग परदेशी यांनी वादी दि.१५.१०.२०२४ रोजी मयत झालेचे कथन करुन ते वादी ट्रस्टतर्फे लालसिंग परदेशी यांचे सर्वावर म्हणुन त्यांची नेमणुक झाल्याने दाव्यास दुरुस्ती करण्याची त्यांनी विनंती केलेली आहे. सदर नि.३६ वरील अर्ज हा प्रतिवादी यांनी आक्षेप घेतल्यामुळे अद्यापही चौकशीकरीता प्रलंबित आहे. सदर नि.४२ वरील अर्ज हा सुनिल परदेशी यांच्यावतीने दाखल केलेला आहे. मुळ वादी ही ट्रस्ट असल्याने नि.३६ वरील अर्ज याचा चौकशी केल्यानंतर योग्य निर्णय घेण्यात येईल. परंतु, प्रस्तुत अर्ज हा त्रयस्थ इसम सत्यनारायण सारडा यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची प्रत दाखल करणेकरीता आहे. सुनिल परदेशी हे आज उपस्थित असुन त्यांच्या कथनानुसार अर्जातील मजकुर विचारात घ्यावा. सदर प्रकरण परिस्थिती अभिलेखावर आणण्याकरीता न्यायाच्या दृष्टीने अर्ज मंजुर करणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादी अथवा अन्य कोणाचेही नुकसान होणार नाही. सदर कागद हा विश्वासार्ह आहे अथवा नाही याचा विचार सदर कागद अभिलेखावर घेतल्यानंतर करता येवु शकतो. त्यामुळे प्रतिवादी यांचा आक्षेप हा मान्य करण्यासारखा नाही. सबब खालील आदेश-

आदेश

अर्ज मंजुर करण्यात येतो.

RAHUL SURESH DHADAKE
Digitally signed by RAHUL SURESH DHADAKE
Date: 2025.05.08 12:35:13 +0530

अहमदनगर
दि.०८.०५.२०२५

( आर. एस. धडके )
२५वे सहदिवाणी न्यायाधीश व. स्तर,
अहमदनगर